हनुमान शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

# कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ

ता. सोनपेठ जि. परभणी.

# महाविद्यालयाचा वार्षिक अहवाल

(शै. वर्ष २०१६- २०१७)

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

वाण नदीच्या तीरावर वसलेल्या सोनपेठ नगरीमध्ये उच्च शिक्षणाचा वसा चालवण्याचा अट्टहास धरुन ह.शि.प्र.मं. संचलीत कै.रमेश वरपूडकर महाविद्यालय आपली वाटचाल उत्तरोत प्रगतीच्या दिशेने करत आहे. सोनपेठ सारख्या ग्रामीण भागात उच्च शिक्षणाचा दर्जेदार विकास साधून विद्यार्थीकेंद्रीत अध्ययन अध्यापनाची एक उज्जवल परंपरा आमचे महाविद्यालय चालवत आहे. भव्य व सुसज्ज इमारत, खेळासाठी भव्य क्रिडांगण, विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळण्यासाठी स्वतंत्र रासेयो व सांस्कृतिक विभाग, महाविद्यालयाच्या परिसरात CCTV कॅमेऱ्याची सुविधा, अनुभवी व तज्ञ प्राध्यापक वर्ग आदी वैशिष्ट्यांनी मंडीत झालेल्या आमच्या महाविद्यालयातील विविध विभागामार्फत वर्षभर विविध उपक्रम व कार्यक्रमांचे आयोजन दरवर्षी करण्यात येते. प्रस्तूत वर्षातील विविध विभागाच्या उपक्रमाचा संक्षीप्त अहवाल पुढीलप्रमाणे देत आहोत.

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग :-

रासेयो विभागात दरवर्षी १०० स्वयंसेवकांना प्रवेश दिल्या जातो. या विभागाकडून या वर्षी रक्तदान शिबीर, वृक्षारोपण, परिसर स्वच्छता, विविध जयंत्या व पुण्यतीर्थीचे औचित्य साधून वेगवेगळे उपक्रम राबवण्यात आले रासेयोच्या वतीने २५ मे ते ३ जून २०१६ या कालावधीत 'आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर'मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे संपन्न झालेल्या महाविद्यालयाच्या कु. वैष्णवी देशपांडे, कु. मंदाकिनी आवटे, पवन पांचाळ व संतोष घोडके यांनी महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केले.

यावर्षीचे रासेयो विशेष शिबीर मौजे गवळी पिंपरी येथे दि.२५ फेब्रु २०१७ ते ०३ मार्च २०१७ दरम्यान पार पडले. या शिवाय 'रस्ता सुरक्षा अभियान', 'मतदार नोंदणी अभियान','पल्स पोलिओ लसिकरण' या राष्ट्रीय कार्यातही प्रस्तूत विभागाच्या स्वयंसेवकांनी आपले योगदान दिले.

पुणे येथे झालेल्या 'उत्कर्ष' साठी महाविद्यालयाच्या कु. वैष्णवी देशपांडे यांनी स्वा.रा.ती.म.विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व केले रासेयो विभागाची सुर्व धुरा विद्यार्थीनीने डॉ.एम.डी कच्छवे, डॉ. एस.डी. अंभुरे,डॉ. एस.ए.टेंगसे यांनी कार्यक्रमाधिकारी म्हणून सांभाळली.

## सांस्कृतिक विभाग :-

महाविद्यालयाची खरी सांस्कृतिक ओळख तयार करु पाहणाऱ्या या विभागाअंतर्गत याही वर्षी वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात विविध जयंती व पुण्यतिथी निमित्य अभिवादन कार्यक्रम घेण्यात आले. २६ नोंव्हे २०१६ रोजी 'संविधान दिना' चे औचित्य साधून उद्देशपत्रिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

स्वा.रा.ती. म.वि. नांदेडच्या आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव 'मातोश्री - २०१६' मध्ये २९ सप्टें ते ०२ ऑगस्ट २०१६ या कालावधीत महाविद्यालयाच्या एकूण २२ विद्यार्थ्यांनी दहा कलाप्रकारात आपला सहभाग नोंदवला.



Scanned with OKEN Scanner

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Dist.Parbhani

२६ डिसें २०१६ रोजी स्वच्छ भारत मिशन व जि.प.परभणी यांच्याकडून प.स.सोनपेठच्या सहकार्यांने स्वच्छता मित्र वक्तृत्व करंडक स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते. यात वरिष्ठ गटातुन मुंजा शिंगाडे (प्रथम), कु. भोसले सुनिता (व्दितीय) तर कु. ज्योती शिंदे (तृतीय) यांनी परितोषीके पटकावली.

विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव मिळावा म्हणून दि.३१ जाने ते ०१ फेब्रु २०१७ दरम्यान महाविद्यालयात 'बळीवंत २०१७' या वार्षीक स्नेह संमेलनाचे आयोजन करण्यात आले. यासाठी उद्घाटक म्हणून राजेशदादा विटेकर तर प्रमुख पाहूणे म्हणून कवी आत्माराम कुटे व श्री विठ्ठल चव्हाण हे उपस्थित होते. सांस्कृतिक विभागांची धुरा प्रा. सखाराम कदम, डॉ. बापुराव आंधळे व डॉ. मुक्ता सोमवंशी यांनी सांभाळली.

## क्रिडा विभाग :-

महाविद्यालयाच्या क्रिडा विभागातर्फे दरवर्षी वेगवेगळ्या क्रिडा स्पर्धांचे आयोजन केले जाते. अनेक स्पर्धांसाठी विद्यार्थी पाठवले जातात. अनेक विद्यार्थ्यांनी क्रिडाक्षेत्रात निर्माण केलेला दबदबा आजही कायम कायम आहे.

क्रिडा विभागातर्फे २१ जून २०१६ रोजी आंतरराष्ट्रीय योगा दिन साजरा करण्यात आला महा -विद्यालयाच्या गौतम साळवे व गणेश मालसमिंदर या विद्यार्थ्यांनी पी.एन.कॉलेज नांदेड येथे ३० जुलै २०१६ रोजी झालेल्या आंतर महाविद्यालयीन जलतरण स्पर्धेत सहभाग नोंदवला.

श्री संत जनाबाई महाविद्यालय गंगाखेड येथे १३ सप्टें. २०१६ रोजी झालेल्या कुस्ती स्पर्धेत महाविद्यालयाकडून कृष्णा बर्वे, कपील स्वामी व भारत रसाळ या विद्यार्थ्यांचा संघ सहभागी झाला. पाथरी येथे व्हॉलीबॉल निवड चाचणीसाठी सहभागी झाला. पाथरी येथे हॉलीबॉल निवड चाचणीसाठी महादेव कांबळे या विद्यार्थ्यांला पाठवण्यात आले.

यावर्षी महाविद्यालयातील सय्यद साबाज व सय्यद आझम यांची विद्यापीठाच्या 'क' झोन संघात फुटबॉल खेळासाठी निवड झाली स्वामी कपिल ऊमाशंकर याने १२५ किलो वजनी गटात कुस्तीस्पर्धेसाठी वर ज्यूदो स्पर्धेसाठी निवड झाली.

हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांचा २९ ऑगस्ट हा जन्मदिवस महाविद्यालयात क्रिडादिन म्हणून साजरा करण्यात आला. क्रिडा संचालक डॉ. गोंविंद वाकनकर यांनी वेळोवेळा विद्यार्थ्यांना खेळासाठी प्रेरणा व प्रोत्साहन दिले. पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण शिबीर, सावित्री दौड रॅलीचे आदी उपक्रम यशस्वीरितीने पार पडले.

## COC (career & counseling call) :

सोनपेठ परिसरातील गरीब व होतकरु विद्यार्थ्यांसाठी दि.२८/०६/२०१६ रोजी मोफत स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन करण्यात आले व स्पर्धा परीक्षा घेण्यात आली. याशिवाय शिवविद्या प्रबोधिनी मुंबई व महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांची निवडपूर्व स्पर्धा परीक्षा घेण्यात आली व सहभागी ४३ विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.

COC चे उद्घाटन व मार्गदर्शन सो.पो. स्टेशनचे श्री सदानंद येरेकर (PI) यांनी २८ जुलै २०१६ रोजी केले. यशवंतराव चव्हाण सामान्य ज्ञान परीक्षचे आयोजन केले होते. त्यात महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. COC विभाग प्रा. के. एम. गोलेकर, डॉ.ए.पी. बर्वे, डॉ. बी. आर. शिंदे व डॉ. एस. व्ही. रणखांब यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी वाटचाल करतो आहे.

Scanned with OKEN Scanner

Late Ramesh Wa... College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

**ग्रंथालय विभाग :-**

या शैक्षणिक वर्षात ग्रंथालयाकडून संदर्भ ग्रंथ आणि अभ्यासक्रमाची एकूण १५२ पुस्तके खरेदी करण्यात आली. याशिवाय बावीस नियतकालीके व अठरा दै. वर्तमानपत्रे विद्यार्थ्यांना वाचनासाठी उपलब्ध करण्यात आली. या शिवाय E- Journals व E - Book ची अद्ययावत सुविधा ग्रंथालयात उपलब्ध करण्यात आली.

" संशोधना माहिती तंत्रज्ञानाचा वापर" ही बहुविद्याशाखीय कार्यशाळा पं. गु. पार्डीकर महा. सिरसाळा व प्रस्तूत विभगाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली. याशिवाय १२ ऑगस्ट २०१६ रोजी ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ एस.आर.रंगनाथ यांची जयंतीचे औचित्य साधून ग्रंथालयामार्फत पुरवण्यात येणाऱ्या विविध सेवा तसेच वेबसाईट्स वरील माहिती शोधण्याच्या पध्दतीबद्यल मार्गदर्शन केले.

१५ ऑक्टो २०१७ रोजी माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी. जे अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस 'वाचन प्ररेणा दिन' म्हणून साजरा करण्यात आला.

विशेष उपक्रम म्हणून महाविद्यालयातील प्रत्येक कर्मचाऱ्यांचां वाढदिवसा निमित्त संदर्भ ग्रंथ व क्रमिक पुस्तेक ग्रंथालयास ग्रंथभेट स्वरुपात प्राप्त होत आहेत. ग्रंथालय विभागाची संपूर्ण जबाबदारी ग्रंथपाल श्री अनंत सरकाळे व ग्रंथालय परिचर संतुक परळकर यांनी उचलली.

**Best Practices innovative committee :-**

महाविद्यालयामार्फत दरवर्षी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षक व विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी म्हणून उत्कृट शिक्षक व उत्कृष्ट विद्यार्थी हा पुरस्कार देवुन वार्षीक स्नेह संमेलनात त्यांचा गौरव केला जातो. त्या अंतर्गत यावर्षी

उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार - **डॉ. पाटील मुकुंदराज बाबूराव** यांना देवून गौरव करण्यात आला तसेच उत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कारासाठी खालील पाच विद्यार्थ्यांची निवड करुन त्यांचाही गौरव करण्यात आला.

१) कु. पुजा प्रकाशराव वांकर B.Com.T.Y
२) कु. मनिषा सत्यप्रेम नखाते B.A.T.Y
३) कु. ज्योती बालासाहेब हारकाळ B.A.T.Y
४) कु. निता तुकाराम रसाळ B.Sc.T.Y
५) आगळे अविनाश तुकाराम B.Sc.F.Y

विद्यार्थी दत्तक योजने अंतर्गत महाविद्यालयात विविध प्राध्यापकांनी ३० गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना दत्तक घेवून त्यांची शै. फीस, परीक्षा फी, बससाठीचा पास व शै. साहित्य आदी स्वरुपाची मदत केली.

महाविद्यालयातील एकूण दहा कर्मचाऱ्यांनी माता-पिता आधार योजनेअंतर्गत आई-वडिलांना आर्थिक मदत केली. महाविद्यालयाकडून इंधन बचत व पर्यावरण संवर्धन करण्याच्या उद्देशाने No vehicle day दर महिन्याच्या पंधरा व तीस तारखांना दोन दिवस पाळण्यात येतो.

विद्यार्थ्यांना सोशल साईटच्या माध्यमाचा शैक्षणिक वापर करुन महाविद्यालयाच्या विविध कार्यक्रम, बातम्या तसेच सेमिनार, परीक्षेसंबंधीच्या सूचना याशिवाय विषयनिहाय माहिती मिळण्यासाठी १३ विषयाचे व्हाटसअपग्रुप तयार करुन माहितीची देवाण घेवाण करण्यात येते. हा विभाग त्याच्या सहकार्याने आपली वाटचाल करतो.

- **महिला सक्षमीकरण, लैंगिक अत्याचार प्रतिबंध व महिला तक्रार निवारण कक्ष :-**

महाविद्यालयाकडून मुलींच्या शिक्षणास उत्तेजन मिळावे म्हणून महिला अधिव्याख्यात्यांमार्फत महिलासाठी काम करणारा हा विशेष कक्ष कार्यरत आहे. सबलीकरण व विशाखा समिती या विषयावर दि. ०९ ऑगस्ट २०१६ रोजी एकदिवशीय विभागीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये जि.परिषदेच्या कर्मचारी महिलांसह परिसरातील ८० महिलांनी सहभाग नोंदवला.



Scanned with OKEN Scanner

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

१२ जानेवारी २०१७ रोजी राजमाता जिजाऊ जन्मदिवसानिमित्त महाविद्यालयात माँ. जिजाऊंच्या प्रतिमेचे पूजन करून सामूहिक जिजाऊवंदना घेण्यात आली.

८ मार्च २०१७ रोजी 'जागतिक महिला दिना' निमित्त महाविद्यालयात 'माता-पालक मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थीनींच्या छेडछाडीला आळा बसावा म्हणून महाविद्यालयाच्या संपूर्ण परिसरावर CCTV कॅमेऱ्यांची करडी नजर आहे. या विभागा वर डॉ. सुनिता टेंगसे डॉ. वनिता कुलकर्णी व डॉ. मुक्ता सोमवंशी या महिला कर्मचारी नियुक्त असल्यामुळे विद्यार्थीनींच्या अडीअडचणी वेळोवेळी सोडवल्या जातात.

- **ॲण्टी रॅगिंग कमिटी** महाविद्यालयात कार्यरत असून वर्षभरात एकही रॅगिंग प्रकरण घडले नाही. या विभागावर प्रा. अंगद फाजगे, प्रा. गोविंद वाकणकर व डॉ. सुनिता टेंगसे यांनी कार्य केले.

- **बहि:शाल शिक्षण केंद्र :-**

स्वा.रा.ती.म.वि. नांदेड विद्यापीठाने चालू वर्षी महाविद्यालयातील डॉ. एम. डी.कच्छवे, डॉ. बी. व्ही. आंधळे व डॉ. रणखांब एस. व्ही यांना बहि:शाल व्याख्याते म्हणून मान्यता दिली.

या व्याख्यात्यांनी विविध बहि:शाल शिक्षण केंद्राकडून आयोजित व्याख्यानात वेगवेगळ्या विषयावर व्याख्याने दिली.

* **कला विद्याशाखेतील विविध विषयांचा अहवाल :-**

- **मराठी विभागः-**

* दरवर्षीप्रमाणे या वर्षीही मराठी विभागाची शै. सहल कपिलधार जि. बिड येथे दि. २२ सप्टेंबर २०१७ रोजी नेण्यात आली होती. विरशैव संपदाय व मन्मथ स्वामींचे लेखन याविषयी सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

* शासन निर्णयाप्रमाणे १ जाने. ते १५ जाने २०१७ दरम्यान मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक डॉ. बा. आं. म. विद्यापीठ औरंगाबादचे व्यवस्थापन समिती सदस्य प्रा. डॉ. मुंजा धोंडगे यांनी मार्गदर्शन केले.

* तसेच मराठीतील ख्यातनाम लेखक, कवी यांच्या लाभलेल्या सन्मानाचे स्मरण म्हणून तसेच लेखकाच्या निधनानंतर विभागातर्फे भित्तीपत्रके व श्रध्दांजली वाहण्यात येते. या वर्षी डॉ. आसाराम लोमटे यांना साहित्य अकादमी पुरस्कार मिळाल्याबद्यल भित्तीपत्रक तयार करण्यात आले. तसेच डॉ. कृष्णा किरवले यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

* दि. २७ फेब्रु. २०१७ रोजी ***जागतिक मराठी भाषा दिनाचे*** औचित्य साधून प्रा. डॉ. सा.द.सोनसळे, प्रा. विठ्ठल जायभाये व अनंत सरकाळे यांनी मार्गदर्शन केले.

**प्राध्यापकांचे विशेष योगदान :-**

मराठी विभागातील प्रा.सखाराम कदम यांनी विविध वर्तमानपत्रातून 'अभयसाधक बाबा आमटे (दै.दिलासा)','क्रांतीज्योती सावित्रीमायीची काव्यफुले (दै.देशोन्नती मधून ३ भागात क्रमशः)' इ. विविध लेख, परभणी आकाशवाणीवर शिवजयंती निमित्त ***प्रजाहितदक्ष,लोककल्याणकारी राजा शिवछत्रपती*** हे भाषण प्रसारीत करण्यात आले. मराठी विभागातील डॉ. बा.मु.काळे व डॉ.सा.द.सोनसळे हे CAS समितीवर विषयतज्ञ म्हणून निवड, तसेच विविध कार्यशाळा, सेमिनार व परिषदेत सहभाग व शोधनिबंध वाचन विद्यापीठीय पेपर सेटींगसाठी निवड व नियामन कार्यात सहभाग नोंदवला.



Scanned with OKEN Scanner

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

- **हिन्दी विभाग :-**

या विभागातर्फे वर्षभरात हिन्दी अध्ययन मंडल, प्रेमचंद्र जन्मदिन, विश्व हिन्दी दिवस,(१० जाने २०१७ ) रक्षाबंधन, सूर्यकांत त्रिपाठी निराला जन्मदिन (३ अक्टू. २०१६), आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

**विभागातील अधिव्याख्यात्यांचे योगदान :-**

यावर्षी **प्रा. शिवाजी वडचकर** यांनी डॉ. बा. आ. म. विद्यापीठाची पीएच. डी. पदवी तसेच राष्ट्रीय चर्चासत्रे, कार्यशाळा संपादन, परिषदेतही सहभाग नोंदवला. स्वा. रा. ती. म. विद्यापीठाच्या परीक्षेची पेपर सेटींग व मूल्यांकनाचे काम तसेच महाविद्यालयाच्या विविध समितीवर कार्य केले. यासह 'हिन्दी काव्य और वर्षा' या स्वलिखीत पुस्तकाचे साहित्यायन प्रकाशन कानपूर कडून २५ फेब्रु २०१७ रोजी प्रकाशन करण्यात आले.

**२) डॉ. वनिता कुलकर्णी :-**

स्वा.रा.ती.म. विद्यापीठाच्या प्रश्नपत्रिकेचे सेटींग व मुल्यांकनाचे कार्य केले.८ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमीत्त LRK School, मुक्तेश्वर विद्यालयात मार्गदर्शन म्हणून कार्य पूर्ण महिला 'सबलीकरण व विशाखा समिती' कडून आयोजित एक दिवशीय कार्यशाळेत सक्रीय सहभाग तसेच अनेक राष्ट्रीय परिषदा व चर्चासत्रातून शोधनिबंधाचे वाचन व प्रकाशन करण्यात आले.

- **इंग्रजी विभाग :**

महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागात विविध विद्यार्थी केंद्रीत उपक्रमाचे आयोजन करण्यात येते रविंद्रनाथ टागोर यांच्या स्मृती दिनानिमीत्य इंग्रजी मंडळाची स्थापना करण्यात आली. तसेच विल्यल शेक्सपिअरच्या वर्धापनदिना निमीत्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वर्धापन दिनी 'बार्ड ऑफ अव्हान' नावाचे पोस्टर विद्यार्थ्यांनी तयार केले होते. 'नोबेल इंडियन' नावाचे पोस्टर पण विद्यार्थ्यांनी तयार केले होते. विद्यार्थ्यांनी भितीपत्रकामध्ये महत्वपूर्ण विषयांची मांडणी थोडक्या शब्दात केली. हे पोस्टरस प्रा. विद्यासागर बागडे व नरहारे सर यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले. इंग्रजी विभागात बाहेरच्या देशातील विद्यार्थ्यांना रोटरी क्लबतर्फे आपल्याकडे बोलावून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाव्दारे विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या देशांत सांस्कृतिक वातावरण कशाप्रकारचे आहे हे कळाले. हा पूर्ण कार्यक्रम डॉ. प्राचार्य सातपुते सर यांच्या मार्गदर्शना खाली पार पाडला. यात प्रा. जायभये सरांनी सुत्रसंचालन केले व डॉ. पाटील सरांनी आभार आभार मानले.

**अधिव्याख्यांत्यांचे योगदान :**

***प्राचार्य डॉ. व्ही.डी.सातपुते :***

१. रोटरी क्लबच्या वेगवेगळ्या उपक्रमात सहभाग
२. N.S.S. कॅम्पच्या उद्घाटन व समारोप प्रसंगी भाषण केले.
३. अनेक गावामध्ये शिव जयंतीच्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले.
४. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या इंग्रजी विषयाच्या गेल्या दहावर्षापासून अभ्यास मंडळावर सदस्यपदी नेमणुक.
५. स्वा.रा. ती. म. वि. नांदेड, भारतीयार विद्यापीठ, कोईम्बूतर आणि जे.जे.टी. विद्यापीठ राजस्थान या विद्यापीठांमध्ये संशोधक मार्गदर्शक म्हणून नेमणुक.
६. U.G.C ने मंजूर केलेल्या 'English Language and Literature teaching distance mode in Maharashtra: Problems and Prospects' या प्रकल्पावर संशोधन सुरु आहे.
७. वेगवेगळ्या परिषदेमध्ये शोधनिबंध प्रसिध्द केले आहेत तसेच अध्यक्ष स्थान भूषविले.



Scanned with OKEN Scanner

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

***प्रा. जायभाये व्ही.के.***

१. तालुक्यात वेगवेगळ्या गावामध्ये शिवजयंती निमीत किर्तन केले.
२. सोनपेठ तालुक्यातील वारकरी मंडळाचे उपाध्यपद.
३. N.S.S. कॅम्पमध्ये भाषण.
४. भारत स्वाभिमान व पतंजली योग समितीचे तालुक्यातील संघटकपद.
५. 'योदादिनी' तालुक्यात वेगवेगळ्या शाळा, कॉलेज मध्ये योग्याविषयी माहिती सांगण्याचे काम केले.
६. मराठी भाषादिना नितीत्त मुख्य अतिथी म्हणुन मराठी विभागात भाषण दिले.
७. U.G.C. चे मंजूर केलेल्या the comparative stuaty of the Autojogruphig of Nelsan Mandela and Barack obama या प्रकल्पावर संशोधन सुरु आहे.
८. वर्गामध्ये PPT चे सादरीकरण .
९. वेगवेगळ्या परिषदामध्ये सहभाग.

**समाजशास्त्र विभाग :-**

समाजशास्त्र विभागातर्फे या वर्षी वृक्षारोपन व वृक्षसंवर्धन बाबत NSS विभाग व प्रजपिता ब्रम्हकुमारी इश्वरीया विश्वविद्यालय शाखा सोनपेठच्या संयुक्त विद्यमाने वृक्षांना राखी बांधून वृक्षसंगोपनाची शपथ घेतली. यासोबतच समाजशास्त्र अभ्यास मंडळाची स्थापना करुन भितीपत्रके सेमिनार चे आयोजन करण्यात आले. सावित्रीबाई फुले जयंती, जिजाऊ जयंती व महिला पालक मेळाव्याचे आयोजनातही सक्रीय सहभाग विभागाने नोंदवला.

समाजशास्त्र विभागाच्या डॉ. एम.ए. टेंगसे यांनी स्वा.रा.ती.म. विद्यापीठाच्या अभ्यासमंडळावरील नियुक्ती व पेपरसेटींग पेपर मूल्यांकन यातही सहभाग नोंदवला विभागातर्फे कु. ज्योती हारकाळ या विद्यार्थिनीला बसपासाठी मदत मिळवून दिली.

समाजशास्त्र विभागाकडून मार्च २०१६ काढण्यात आलेल्या शैक्षणिक सहलीत परळी, अंबाजोगाई व तेर या ठिकाणाचे अभ्यासपूर्ण दौरे झाले. याशिवाय विविध परिषदा, कार्यशाळा व राष्ट्रीय चर्चासत्रातून विभागातील डॉ. टेंगसे एस.ए. व प्रा. जोंधळे पी.टी. यांनी सहभाग नोंदवला.

राज्यशास्त्र विभाग :-

राज्यशास्त्र विभागातर्फे ही वर्षभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. २६ नोंव्हे २०१६ रोजी संविधान दिनाचे व त्या निमित्य डॉ. सा.द.सोनसळे यांच्या मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले. दरवर्षी प्रमाणे दै.सकाळ माध्यम समूहाच्या VIN (Yoong Inspirators Network) च्या प्रतिनिधीची निवड दि.०३/०९/२०१६ रोजी मतदानाद्वारे करण्यात आली. यामध्ये डॉ. गोलेकर के.एम. यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून तर डॉ.बी. व्ही. आंधळे यांनी निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहिले. विभागातील प्राध्यापकांनी विविध राष्ट्रीय चर्चासत्रे, परिषदा, कार्यशाळेतूनही सहभाग घेतला दि.०६ मार्च २०१७ रोजी तेर येथे शै. सहलीचे आयोजन करुन सातवाहनकालीन संस्कृतीचा अभ्यास केला.

विभागातील यावर्षीची प्रमुख उपलब्धी म्हणजे प्रा. डॉ. कल्याण गोलेकर यांनी "भारतीय न्याय व्यवस्थेतील न्यायालयीन स्वातंत्र्य आणि सक्रियता एक अभ्यास" या विषयावर स्वा.रा.ती.म.विद्यापीठ नांदेडकडून Ph.D. पदवी संपादन केली.

Scanned with OKEN Scanner

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

**लोकप्रशासन विभाग :-**

लोकप्रशासन विभागाच्यावतीने अनेक नविन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन वर्षभर करण्यात आले. दि.९ ऑगस्ट २०१६ रोजी महाविद्यालयात 'महिला सक्षमीकरण समिती', 'विशाखा समिती', विशाखा समिती व पं.स.सोनपेठच्या संयुक्त विद्यमाने एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

दिनांक. २६ नोंव्हे.२०१६ रोजी संविधान दिनाचे औचित्य साधून डॉ. बी.आर. आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन, उद्येशपत्रिकेचे सामूहिक वाचन, मूलभूत कर्तव्यांचे वाचन करुन संविधान पालनाची शपथ घेण्यात आली.

दिनांक. २८ डिसें.२०१६ रोजी लोकप्रशासन शास्त्राचे जनक वुड्रो विल्सन यांच्या जयंतीचे औचित्य साधून लोकप्रशासन दिन साजरा करण्यात आला. २६ जाने प्रसासत्ताक दिनानिमित्त भित्तिपत्रकाचे प्रकाशन केले. संविधान जनजाग्रती तसेच स्वच्छतेचे महत्व पटवून देण्यासाठी शहरात रॅलीचे आयोजन करण्यात आले यात पथनाट्य सादर केले.

विभागातील प्रा.डॉ. सोमवंशी एम.जी व प्रा. जाधव ए.के. यांनी विविध राष्ट्रीय चर्चासत्रे परिषदा, कार्यशाळेतून शोधनिबंधाचे वाचन केले. याशिवाय वेगवेगळ्या ठिकाणी व्याख्याने, मार्गदर्शन केले.

डॉ. सोमवंशी एम.जी यांचे उल्लेखनिय कामगीरी लक्षात घेवून पंजाबराव देशमुख शिक्षक परिषदेकडून ( PDRSP) परभणी जिल्हास्तरीय पुरस्कार देवून त्यांचा दि.१२ डिसेंबर २०१६ रोजी यथोचित गौरव करण्यात आला.

**इतिहास विभाग अहवाल २०१६-१७ :**

महाविद्यालयात इतिहास विभाग कार्यरत असून या विभागातर्फे अनेक उपक्रम राबविले जातात. राजर्षी शाहू महाराजांची जयंती या विभागातर्फे दरवर्षी साजरी केली जाते. याशिवाय विभागातर्फे मराठवाडा मुक्तीदिना निमित्त भित्तीपत्रकाचे प्रकाशनही केले जाते. इतिहास विभाग दरवर्षी शैक्षणिक सहल आयोजित केल्या जाते. त्या निमित्ताने विद्यार्थ्यांना भारताचा इतिहास जाणून घेता येतो.

इतिहास विभाग प्रमुख डॉ. मिसाळ यांच्याकडे स्कॉलरशीप समितीचाही पदभार आहे. समिती दरवर्षी एक कॅम्प घेऊन मुलांना स्कॉलरशिप संदर्भात मार्गदर्शन करते परिणामी आसिक उत्तार अरुण धर्मे, आणि इतर विद्यार्थ्यांना मेरीट स्कॉलरशीप मिळाली आहे. इतिहास विभागप्रमुख डॉ. मोहन मिसाळ यांनी स्वा.रा.ती. म. विदयापीठ दुराशिक्षण एम.ए.इतिहास प्रथम वर्षासाठी मध्ययुगीन भारताचा संशिप्त इतिहास हे पुस्तक लिहले आहे. विद्यापीठाने ते प्रकाशित केले आहे.

**अर्थशास्त्र विभाग :-**

अर्थशास्त्र विभागातील प्रा. अंगद फाजगे व प्रा. डॉ.आंबादास बर्वे यांनी विविध चर्चासत्र, परिषद, कार्यशाळेतून विविध शोध निबंधाचे वाचन केले.

**विज्ञान विद्याशाखेतील विविध विषयांचा अहवाल :**

**वनस्पतीशास्त्र विभाग :-**

दरवर्षी प्रमाणे वनस्पतीशास्त्र विभागातर्फे निरनिराळे शैक्षणिक व शिक्षण पुरक उपक्रम याहीवर्षी राबवण्यात आले.



Scanned with OKEN Scanner

दि.२५/०८/२०१६ रोजी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील उती संवर्धन केंद्रास बी. एस्सी. तृतीय वर्षांच्या विद्यार्थ्यांसह भेट दिली. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांसाठी संत जनाबाई महाविद्यालय गंगाखेड येथील वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख आर.जी. लड्डा, यांचे 'गेस्ट लेक्चर' दिनांक. ०२/०२/२०१७ रोजी आयोजीत करण्यात आले होते. विभागातील एकमेव सहा. प्राध्यापक डॉ. एम.बी.पाटील यांच्या दोन क्रमीक पुस्तकाचे प्रकाशन यावर्षी जि.प.परभणीचे अध्यक्ष राजेशदादा विटेकर व मा. आ. व्यंकटराव कदम यांच्या हस्ते संस्थाध्यक्ष परमेश्वर कदम व प्राचार्य डॉ. वसंत सातपुते यांच्या उपस्थीतीत करण्यात आले. त्याचप्रमाणे महाविद्यालयातील CBCS वरील कार्यशाळेमध्ये डॉ. पाटील यांनी साधनव्यक्ती म्हणून मार्गदर्शन केले. याच वर्षी डॉ. पाटील यांनी पदव्युत्तर शिक्षक (P.G. Teacher) आणि संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता भेटली.

Extension Activities अंतर्गत विभागातर्फे शेतकऱ्यांसाठी "शेती सल्ला" अंतर्गत साप्ताहीक 'शंभू टाईम्स' मध्ये शेतीविषयक सल्ला देण्यात आला. याचा फायदा सोनपेठ परिसरातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात झाला. त्याचमाणे आकाशवाणी परभणी केंद्रा मार्फत निसर्गायन कार्यक्रमाअंतर्गत डॉ. पाटील यांनी उद्‌बोधन केले.

महाविद्यालयाच्या वाटचालीतील डॉ. एम. बी. पाटील यांचे योगदान लक्षात घेवून त्यांना महाविद्यालयातर्फे देण्यात येणारा "Best Teacher Award २०१६ " देण्यात आला.

❑❑❑

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani